वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर करिता आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१८/प्र.क्र. १३९/३-अे,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०००३२

दिनांक : ३ जून, २०१९

संदर्भ :

१) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. वनास १००१/सीआर १८४/१९-अे, दि.३१.१०. २००१

२) संचालक,वनामती यांचे पत्र क्र.वनामती /आस्था /आसविअ /प्राधिकार/१८६७/१८, दि. १३.६.२०१८

३) महाराष्ट्र कोषागार नियम,१९६८ मधील नियम क्र.१५६

प्रस्तावना :

वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर करिता संदर्भाधीन दि. ३१.१०.२००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नागपूर यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले होते. सदर संस्थेकरिता जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नागपूर यांच्या ऐवजी वनामती संस्थेच्या आस्थापनेवरील वरिष्ठ प्रशासन नि लेखाधिकारी (राजपत्रित गट अ - वर्ग १) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय : -

वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर करिता वनामती संस्थेच्या आस्थापनेवरील वरिष्ठ प्रशासन नि लेखाधिकारी (राजपत्रित गट अ -वर्ग १) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र. ३६/१९/कोषा प्रशा-५, दि.५.२.२०१९ अन्वये देण्यात आलेल्या सहमतीनुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०३१२४४४७०९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.06.03 12:50:58 +05'30'

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती -

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव

२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
३. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था,नागपूर
६. संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० जादा प्रतींसह)
७. सर्व संचालक / सर्व सहसंचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर,
९. सर्व विभागीय कृषी सह संचालक,
१०.कृषि सह संचालक (विस्तार), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,
१२. प्राचार्य, सर्व रामेती, महाराष्ट्र राज्य, पुणे (पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, नाशिक, नागपूर व खोपोली)
१३. सहसंचालक, लेखा व कोषागारे (संगणक कक्ष), नवीन प्रशासन भवन, मुंबई,
१४. वित्त विभाग (व्यय-१ / अर्थसंकल्प-१२), मंत्रालय, मुंबई-३२
१५. नियोजन विभाग का.१४३२, मंत्रालय, मुंबई-३२
१६. सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन १२ अे, मंत्रालय, मुंबई-३२
१७. कार्यासन २-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१८. निवड नस्ती.३अे